# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/12/2023 (शनिवार) सायंकाळ

---

**नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून शेतकऱ्यांच्या ११३,४६,९९,००३/—रूपयाचा अपहार करून फसवणुक करणारा मुख्य आरोपी गजाआड**

पोलीस स्टेशन मौदा जिल्हा नागपुर ग्रामीण नागपुर येथे नागपुर जिल्हयातील पिडीत १५८ शेतकरी यांना नैसर्गीक आपत्तीमुळे शासनाकडून नुकसान भरपाई देण्याचे आमीष देवून त्यांचेकडुन विश्वासाने संबंधीत कागदपत्र घेवुन शेतकरी यांचे नावे करोडो रूपयाचे बोगस कर्ज प्रकरणे तयार करून ते बँक रेकॉर्डवर खरे असल्याचे दाखवून ११३, ४६, ९९,००३ /—रूपयाचा अपहार करून फसवणुक केल्याचे फिर्यादीचे रीपोर्ट वरून पोलीस स्टेशन मौदा येथे गुन्हे रजि नं. ७८३/२०२३ कलम ४०६, ४०९, ४१३, ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, १२० (ब) भादंवि सहकलम ३ एम. पी. आय. डी. सहकलम ६६(बी) आय.टी. ॲक्ट नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवुन नागपूर ग्रामीणचे पोलीस अधीक्षक श्री. हर्ष ए. पोद्दार (भा.पो.से) यांनी सदर गुन्हयातील मुख्य आरोपी संदीप रेवनाथ जगनाडे सहायक बॅक मॅनेजर यांचा शोध घेवुन अटक करणेकामी स्थानिक गुन्हे शाखा नागपूर ग्रामीण येथील विशेष पथक तयार केले. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक मुख्य आरोपींचा शोध सुरु करून तांत्रिक पद्धत तसेच गोपनिय बातमीदार यांच्याकडुन खात्रीशिर माहिती वरून आरोपी यास स्थानिक गुन्हे शाखेचे पथक पोलीस उपनिरीक्षक बट्टुलाल पांडे व इतर स्टाफ ने चेन्नई येथे शोधकामी जावुन सदर आरोपी हा यवतमाळ येथे असल्याचे माहिती पडल्याने यवतमाळ येथे जावुन आरोपीस अटक केले. सदर आरोपी हा घटनेचे वेळी नागपूर येथे सन २०१६ ते २०१८ मध्ये कार्पोरेशन बॅकेत सहायक मॅनेजर या पदावर कार्यरत होता.

आरोपीस दिनांक १५/१२/२०२३ चे ०२.०० वा. अटक केलेली असुन २०/१२/२०२३ पर्यंत पीसीआर मध्ये आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अप्पर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पोउपनि बट्टुलाल पांडे, पोहवा विनोद काळे, इक्बाल शेख, मोनु शुक्ला, संजय बदोरीया, पोशि राकेश तालेवार यांनी पार पाडली.

## चोरी

**पो.स्टे. खापरखेडा** :— अंतर्गत सात किलोमीटर अंतरावर मौजा सनराइज हॉटेल अँड रिसॉर्ट दहेगाव सावनेर रोड येथे दिनांक १५/१२/२०२३ रोजी फिर्यादी नामे— मृणाल दत्तूजी बोराडे, वय २८ वर्ष, रा. गजानन नगर नारायण शाळेसमोर वाठोडा नागपूर याच्या मानलेल्या बहिणीचे लग्न समारंभाचे कार्यक्रम सनराइज हॉटेल अँड रिसॉर्ट दहेगाव सावनेर रोड येथे असल्यामुळे दिनांक १४/१२/२०२३ रोजी दुपारी तीन वाजता दरम्यान हळदीचा व संगीताचा कार्यक्रम असल्यामुळे हॅन्डबॅग मध्ये ठेवलेले १) ५१ ग्रॅमचा सोन्याचा गोफ किंमती २,२०,०००/—रूपये २) सोन्याची नथनी नऊ ग्रॅम किंमती २०,०००/—रुपये ३) मोबाईल रेडमी वाय थ्री. कंपनीचा किंमती ५,०००/— रुपये ४) नगदी १,०००,००/— रूपये असा एकूण ३,४५०००/— रुपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार रेवतकर मो. नं. ९५४५५२३७३६ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**